Gaavmat

# गावमत

www.gaavmat.in

To.

If undeliverd, please return to

WEEKLY GAAVMAT
Office : Near Police Station Badnapur
Tq.Badnapur Dist Jalna -431202 (Maharastra)
Contact Us: 9923307786,9421947786

❍Volum No 12 ❍Issu No 16 ❍Monday, Date 27.01.2024 To 02.02.2025 ❍Marathi- Weekly ❍Price 2 Rs. ❍Page 4

## पालकमंत्री पंकजा मुंडे यांनी घेतला विविध विभागांचा आढावा

जालना, प्रजासत्ताक दिनाच्या मुख्य ध्वजारोहणाच्या कार्यक्रमाकरीता पर्यावरण व वातावरणीय बदल, पशुसंवर्धन मंत्री तथा जालना जिल्ह्याच्या पालकमंत्री पंकजा मुंडे या जालना जिल्ह्याच्या दौ?यावर आले असता, जिल्हाधिकारी कार्यालयातील सभागृहात त्यांनी विविध विभागाचा आढावा घेतला.

पालकमंत्री पंकजा मुंडे म्हणाल्या की, जालना जिल्ह्याची पालकमंत्री म्हणुन, जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी सर्वोतोपरी प्रयत्न करणार आहे. जिल्ह्यातील विकासाची कामे करण्यासाठी लवकरच नियोजन समिती तयार होईल. विकासाचे काम करतांना कोणाच्याही दबावाला बळी न पडता प्रशासनाने कायद्यानुसार व नियमानुसार काम करावे.



जिल्ह्याची पालकमंत्री म्हणुन मी कायदे व नियमाच्या चौकटीत सामान्य जनतेसाठी काम करणार आहे. जिल्ह्यातील विविध विभाग आणि क्षेत्रातील समस्या असतील त्या मी सोडविण्याचा प्रयत्नकरणार आहे. जालना जिल्ह्यातील पर्यावरण व वातावरणीय बदलाबाबत राबविण्यात येणा?या योजना, भविष्यातील ध्येय धोरणे, घनकचरा व्यवस्थापन, पाणी, हवा प्रदूषण, नदी व तलाव संवर्धन, पर्यावरण जतनकरीताचे सुनियोजित पर्यावरण विभागने आराखडा तयार करावा. जिल्ह्यातील पशुसंवर्धन विभागाने जिल्ह्यातील पशुधन, राज्य व केंद्र पुरस्कृत योजना, एकात्मिक सर्वेक्षण योजना पशुगणना, जिल्हा वार्षिक योजना, विदर्भ-मराठवाडा दुग्ध विकास प्रकल्प, पुण्यश्लोक अहिल्यादेवी महाराष्ट्र मेंढी व शेळी विकास महामंडळ यासह राज्यातील पशुसंवर्धन विभागातील योजनांना गती देण्यासाठी विशेष प्रयत्न करणे आवश्यक आहे. तसेच जिल्ह्यात पशुसंवर्धन विभागाने जिल्ह्यात गोट फार्मींग आणि एक जिल्हा एक उत्पादन कार्यक्रम राबविण्यासाठी प्रयत्न करावे.

जालना जिल्ह्याची औद्योगिक जिल्हा म्हणुन ओळख आहे. यामुळे याठिकाणी पर्यावरणांच्या दृष्टीने नियोजन करण्याचा प्रयत्न करण्यात येईल. पशुसंवर्धन विभागातील योजनांना गती देवून, पर्यावरण विभागातील कामांमध्ये लोकसहभाग घेत पर्यावरणपूरक वातावरणासाठी विशेष प्रयत्नकरणार असल्याचेही श्रीमती. मुंडे यांनी यावेळी सांगितले.

यावेळी पालकमंत्री श्रीमती मुंडे यांनी जिल्हा नियोजन, जिल्ह्यातील प्रकल्प, क्रिडा संकुल, रेशीम, मॅजीक इन्क्युबेशन, प्रादेशिक मनोरुग्णालय, ड्रायपोर्ट आदींचा जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांच्याकडून आढावा घेतला. तसेच पर्यावरण विभाग, पशुसंवर्धन विभाग यांचा आढावा घेत.



## पालकमंत्री पंकजा मुंडे यांची ड्रायपोर्टला भेट

जालना, : राज्याच्या पर्यावरण व वातावरणीय बदल, पशुसंवर्धन मंत्री तथा जालना जिल्ह्याच्या पालकमंत्री पंकजा मुंडे यांनी आज जालना येथील दरेगाव येथील ड्रायपोर्टला भेट देवून पाहणी केली .

यावेळी पालकमंत्री श्रीमती मुंडे म्हणाल्या की, येथील ड्रायपोर्ट प्रकल्प सुरु झाल्यास उद्योगांना खुप मोठी मदत होवून चांगली सुविधा निर्माण होणार आहे. तसेच येथील उत्पादन बाहेर नेण्यास मदत होणार आहे. त्यामुळे ड्रायपोर्टच्या विकासाच्या कामांना अधिक गती देवून, ड्रायपोर्ट लवकरात-लवकर सुरु करण्याच्या सुचना त्यांनी दिल्या.

यावेळी आमदार संतोष दानवे, आमदार नारायण कुचे, जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ, अधिक्षक अजयकुमार बंसल, अप्पर जिल्हाधिकारी रिता मैत्रवार, निवासी उपजिल्हाधिकारी गणेश महाडिक, प्रकल्प व्यवस्थापक विकास मलीक, कॉनकोरचे सहायक अधिकारी शिरीष तळेले, जालना उपविभागीय अधिकारी श्रीमंत हारकर आदींची उपस्थिती होती.

## डॉ.देवेश भैय्या पाथ्रीकर यांचा सत्कार

बदनापूर-निर्मल क्रीडा व समाज प्रबोधन ट्रस्टचे अध्यक्ष डॉ.देवेश पाथ्रीकर यांनी बदनापूर विधानसभा मतदार संघात मागील दोन वर्षांपासून मोफत नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिराच्या माध्यमातून सामाजिक कार्य सुरु केलेलं असल्याने मानदेऊळगाव -दगडवाडी ग्रुप ग्राम पंचायतच्या वतीने गौरव परमानपत्र व शाल श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला.

निर्मल क्रीडा व समाज प्रबोधन ट्रस्ट संचलित न्यू लाईफ केअर हॉस्पिटल बदनापूर व लायन्स नेत्र रुग्णालय चिकलठाणा यांच्या संयुक्त विदयमाने अध्यक्ष डॉ.देवेश पाथ्रीकर यांनी मागील दोन वर्षांपासून बदनापूर अंबड विधानसभा मतदार संघात मोफत नेत्र तपासणी व मोतीबिंधु शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजनास प्रारंभ केलेला आहे,या माध्यमातून गोर गरिबांना दृष्टी देण्याचे महत्वपूर्ण कार्य पाथ्रीकर कुटूंब करीत असल्याने गोर गरीबाच्या कुटुंबाला आधार मिळालेला आहे, डॉ.देवेश पाथ्रीकर करीत असलेल्या सामाजिक कार्यामुळे ग्रामीण भारताला प्रगतीचा नवा मार्ग निश्चित प्राप्त होईल असे शब्द मानदेऊळगाव -दगडवाडी ग्रुप ग्राम पंचायतचे सरपंच गणेश कदम यांनी व्यक्त करीत डॉ.पाथ्रीकर यांना गौरव प्रमाणपत्र व शाल श्रीफळ देऊन ग्रामपंचायत च्या वतीने सत्कार केला.

यावेळी उपसरपंच जगननथ डोळसे ,ग्राम विकास अधिकारी विलास गायकवाड ,ह.भ.प सोमनाथ महाराज नरवाडे ,हभप शाम महाराज जाधव ,हभप जगननथ पाटील,हभप कृष्णा महाराज देशमुख आदी उपस्थित होते.





# स्वतंत्र भारताची नियमावली

26 जानेवारी संविधानाचा व नियमांचा आधारस्तंभ आहे.15 ऑगस्ट 1947 ला भारत स्वतंत्र झाला.परंतु स्वातंत्र्यानंतर संविधान, देशाची नियमावली असने गरजेचे असते.कारण कोणत्याही कार्याकरीता पुढे पाऊल टाकण्यास कायदयाच बंधन असने गरजेचे आहे.26 जानेवारी 1950 रोजी देशाची राज्यघटना लागु झाली.त्यानिमित्याने भारतातील प्रत्येक नागरिक मोठ्या उत्साहाने प्रजासत्ताक दिन साजरा करीत असतो.कारण प्रजासत्ताक म्हणजे लोकांव्दारे लोकांसाठी शासन. भारतात जात,धर्म,पंथ,वंश,गरीब-श्रीमंत, द्वेष या संपूर्ण गोष्टी बाजूला ठेवून गुन्या-गोविंदाने प्रजासत्ताक दिवस वेगवेगळ्या संस्कृतीच्या माध्यमातून मोठ्या उत्साहाने साजरा करतात. 26 जानेवारी 1950 रोजी डॉ. राजेंद्र प्रसाद यांची लॉर्ड माउंट बॅटन(गव्हर्नर जनरल) यांच्या जागी भारताचे पहिले राष्ट्रपती म्हणून निवड झाली.26 जानेवारीच्या निमित्ताने दरवर्षी राष्ट्रपतींच्या हस्ते दिल्लीतील राजपथावर राष्ट्रध्वज फडकवला जातो.आपण 75 वा प्रजासत्ताक दिन साजरा करीत आहोत.मुख्यत्वे करून 26 जानेवारीला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी लिहिलेली राज्यघटना लागु करण्यात आली. त्यामुळे स्वतंत्र भारतासाठी हा मोठा आणि गौरवाचा दिवस मानल्या जातो.भारताला स्वतंत्र होऊन 78 वर्षे झाली असली तरी आजही देशात आपल्याला गुन्हेगारी, भ्रष्टाचार, बँक घोटाळे,झुंड बळी, जातीयवाद, हिंसाचार,यांच्याशी आजही आपण लढतोय ही स्वतंत्र भारतासाठी शोकांतिकाच म्हणावी लागेल.अशा गुन्ह्या विरूद्ध सरकारने व राजकीय पुढा?यांनी एकत्र येण्याची नितांत गरज आहे. कारण देश स्वतंत्र करण्यासाठी महात्मा गांधी,भगतसिंग, राजगुरू, सुभाषचंद्र बोस, झाशीची राणी, लाला लजपतराय, लोकमान्य टिळक, चंद्रशेखर आझाद, हजारो क्रांतिकारक, मवाळवादी -जहालवादी, थोर महात्मे इत्यादीसह लाखो स्वतंत्र शुरविरांनी आपल्या प्राणांची आहुती दिली.तेव्हाच 15 ऑगस्ट 1947 हा दिवस उदयास आला.भारताच्या थोर महात्म्यांना भारत स्वतंत्र करण्यासाठी दोन नदयांचा सहारा घ्यावा लागला व त्या दोन नदयांचा उगम झाला एक मवाळवादी तर दुसरी जहालवालवादी यांच्या संगमानेच भारतीय स्वातंत्र्यलढा उभा झाला. याकरिता आपल्याला 15 ऑगस्ट1947 उजाडण्यासाठी तब्बल 150 वर्षे वाट पाहावी लागली.150 वर्षांच्या काळातील स्वतंत्र विरांचे बलीदान व्यर्थ जावु नये व त्यांचा सन्मान व्हावा या उद्देशाने 26 जानेवारी 1950 रोजी राज्यघटना अस्तित्वात आणली.यात मुख्यत्वेकरून डॉ बाबासाहेब आंबेडकर, डॉ राजेंद्र प्रसाद, सरदार वल्लभभाई पटेल,पंडित जवाहरलाल नेहरूसह अनेक थोर महात्म्यांचा सिंहाचा वाटा आहे.परंतु दुःखाची गोष्ट म्हणजे गेल्या 30 वर्षांपासून देशात भ्रष्टाचार, करोडोचे घोटाळे, बलात्कार, गुन्हेगारी,निवडणुकांमध्ये जातीयवाद याला मोठ्या प्रमाणात उत आल्याचे पहायला मिळते.ही शहिद विरांच्याप्रती अत्यंत दुःखद व चिंताजनक बाब आहे. आपल्या पुर्वजांनी व देशाच्या स्वतंत्र संग्राम सेनानींनी आणि बहादुर विरांनी घर-दार, परीवार या संपूर्ण गोष्टी बाजूला सारून व त्याग करून स्वातंत्र्याच्या अग्नी कुंडात उडी घेतली व लाखोंच्या संख्येने बलीदान दिले. परंतु आपली शोकांतिकाच म्हणावी लागेल की आपण भारत स्वतंत्र होऊन 78 व्या वर्षीत पदार्पण करीत आहोत तरीही भारतातील भ्रष्टाचार थांबलेला नाही.आज भारतातील राजकीय पुढा?यांजवळ, पुंजीपती, वॉलीउडक्षेत्र व भ्रष्ट सरकारी अधिका?यांजवळ वाममार्गाने कमवीलेली करोडोंची चल-अचल संपत्ती आजही आहे. ही संपत्ती एकत्र केली तर भारताला तब्बल 10 वर्षे कोणाही जवळुन कर्ज घ्यावे लागणार नाही व गरीबी संपुष्टात येवु शकते आणि देश सुजलाम - सुफलाम होण्यास मोठी मदत मिळेल.याकरिता भ्रष्ट अधिकारी व भ्रष्ट राजकीय पुढारी ही देशाला लागलेली कीड आहे ही कीड जळामुळासकट नष्ट व्हायला हवी व यावर आळा बसायला हवा.आज मुठभर राजकीय पुढा?यांनी करोडो रुपयांची चल-अचल संपत्ती डांबून ठेवल्याने व चलनात नसल्याने देशातील गरीब वर्ग गरीबीच्या खाईत जात आहे तर श्रीमंत वर्ग दिवसेंदिवस श्रीमंत होत आहे व देशाच्या विकासामध्ये मोठा अडथळा निर्माण होत आहे.यामुळेच देशात महागाई व बेरोजगारी मोठ्या प्रमाणात दिसून येते.भारताचे प्रजासत्ताक दिनाचे 75 व्या वर्षाचे औचित्य साधून देशातील संपूर्ण भ्रष्टाचा?यावर कठोर कारवाई करून त्यांनी वाममार्गाने कमवीलेला पैसा सरकारने आपल्या तिजोरीत जमा करावा. यामुळे देशाचा विकास, बेरोजगारीची समस्या, महागाई यावर आळा घालण्यासाठी मोठी मदत होईल व देशाचा विकास भरभराटीला येईल.याचे स्वागत आपले पुर्वज,शहीद व स्वतंत्र सेनानी अवश्य करेल व त्यांच्या स्वतंत्र लढ्याला दिलासा अवश्य मिळेल हीच प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने शहिदांना खरी आदरांजली ठरेल.देशात वाढते हवामानातील बदल, प्रदूषण व ग्लोबल वार्मिंगचा धोका पहाता.प्रजासत्तक दिनाचे औचित्य साधून मोठ्या प्रमाणात वृक्षलागवड व्हायला हवी. याकरीता शाळा, कॉलेज, संपूर्ण सरकारी क्षेत्र, राजकीय पुढारी, सामाजिक संघटना यांनी पुढाकार घ्यायला हवा.यामुळे मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण होईल व प्रदूषणावर मात करण्यासाठी मोठी मदत मिळेल.आजच्या दिवशी वृक्षलागवड झाली तर ती अनंतकाळापर्यंत सर्वांच्या हृदयात राहील व लाखो शुरविरांचे दर्शन प्रत्येक झाडाच्या पानात, फुलात, फळात व जळामुळात आपल्याला होईल. यामुळे भारतीय शहिदांची व शुरविरांची गाथा अबाध्य आहे.कारण त्यांच्या आशीर्वादानेच आपण आज मोकळा श्वास घेत आहोत.जय हिंद!

# लोकशाहीचा नवा पर्वः प्रजासत्ताक दिन!

भारतातील सर्व शाळा आणि महाविदयालये तसेच शासकीय-खाजगी संस्था, ग्रामपंचायती अशा विविध ठिकाणी ध्वजवंदन केले जाते आणि भारतीय संविधानाप्रती आदर व्यक्त केला जातो.

26 जानेवारीचा हा राष्ट्रीय समारंभ असल्यामुळे या दिवशी सार्वजनिक सुट्टी असते. दि.26 जानेवारी 1950 रोजी नव्याने स्वातंत्र्य मिळालेल्या भारत देशाने संविधान अंमलात आणून लोकशाहीतील एका नव्या पर्वाची सुरुवात केली होती. प्रजासत्ताक दिवस भारतातील तीन राष्ट्रीय सुट्ट्यांपैकी एक आहे. अन्य दोन- स्वातंत्र्यदिन 15 ऑगस्ट व गांधी जयंती 2 ऑक्टोबर हे आहेत. या दिवशी भारताची राजधानी नवी दिल्ली येथे एक मोठी परेड- संचलन राजपथ मार्गावरून निघते. भारतीय प्रजासत्ताक दिवस हा भारताच्या प्रजासत्ताकात दरवर्षी 26 जानेवारी रोजी पाळला जाणारा राष्ट्रीय सणाचा दिवस आहे. विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या संविधान समितीने दि.26 नोव्हेंबर 1949 रोजी भारताचे संविधान स्वीकारले व दि.26 जानेवारी 1950पासून ते अंमलात आणले गेले. पं.जवाहरलाल नेहरू यांनी दि.31 डिसेंबर 1929 रोजी लाहोरजवळ रावी नदीच्या काठी तिरंगा फडकावून पूर्ण स्वराज्याची- स्वातंत्र्याची घोषणा केली होती. त्याची आठवण म्हणून 26 जानेवारी हा दिवस राज्यघटना अंमलात आणण्यासाठी निवडण्यात आला. या दिवशी देशभरात भारताच्या राष्ट्रध्वजाचे आरोहण होऊन त्याला मानवंदना दिली जाते, राष्ट्रगीत म्हटले जाते आणि आदर व्यक्त केला जातो. हा दिवस आपल्या देशातील सुवर्णदिन आहे. या दिवसाची प्राप्ती हजारो देशभक्तांच्या बलिदानातून झाली होती. या दिवशी शाळा, महाविद्यालय शासकीय कार्यालय यांमध्ये विविध कार्यक्रमांसह भाषणे आयोजित केली जातात. संविधान प्रास्ताविकेचे मोठ्याने वाचन केले जाते.

भारताला दीडशे वर्षांहून अधिक कालावधीतील ब्रिटीश राजवटीपासून दि.15 ऑगस्ट 1947 ला स्वातंत्र्य मिळाले. यामागे भारताचा स्वातंत्र्यलढा आणि त्यातील म.गांधींच्या अहिंसा पद्धतीचा मोठा हातभार आहे. तेव्हा स्वतंत्र भारताला स्वतःचे संविधान नव्हते. भारताचे कायदे हे मात्र भारतीय राज्यशासनाच्या सन 1935 सालच्या कायद्यावर- कलमावर आधारित होते. दि.29 ऑगस्ट 1947 रोजी महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या अध्यक्षतेखाली स्वतंत्र भारताचे संविधान तयार करण्यासाठी मसूदा समिती स्थापना केली गेली. या समितीने संविधानाचा मसुदा तयार करून तो सभेपुढे दि.4 नोव्हेंबर 1947 रोजी सादर केला. या सभेने सार्वजनिक चर्चेसाठी सभागृहात हा प्रस्ताव 166 दिवसांसाठी खुला केला होता. तब्बल 2 वर्ष 11 महिने आणि 18 दिवसाच्या प्रदीर्घ कालावधीनंतर समितीने हा मसुदा अंतिम केला. बरेचसे विचारविमर्श आणि सुधारणा केल्यानंतर समितीच्या 308 सदस्यांनी दोन हस्तलिखित प्रती- हिंदी आणि इंग्रजी या दि.24 जानेवारी 1950 रोजी स्वाक्षरांकित केल्या. दोन दिवसानंतर हे भारताचे संविधान संपूर्ण राष्ट्रासाठी लागू करण्यात आले. म्हणून भारतीय संविधानाच्या निमित्ताने हा प्रजासत्ताक दिन साजरा करण्यात येऊ लागला. दरवर्षी 26 जानेवारी रोजी भारताच्या राजधानीत म्हणजे नवी दिल्ली येथे एक मोठे संचलन आयोजित केले जाते. हे संचलन रायसीना हिलपासून राष्ट्रपती भवनापर्यंत राजपथ मार्गाद्वारे जाते. संचलनाच्या अगोदर अनाम सैनिकांसाठी बनवले गेलेले स्मारक व अमर जवान ज्योती येथे भारताचे पंतप्रधान पुष्पचक्र अर्पण करतात. भारतासाठी आपले प्राणार्पण करणा?या वीर सैनिकांना श्रद्धांजली वाहण्यात येते. त्यानंतर पंतप्रधान राजपथाच्या मुख्य मंचावर जातात व आलेल्या पाहुण्यांना भेटतात. तेवढ्यात प्रमुख पाहुण्यांसोबत राष्ट्रपतींचे आगमन होते. राष्ट्रगीत सुरू होताच राष्ट्रपती ध्वजारोहण करतात आणि 21 तोफांची सलामी दिली जाते. त्यानंतर देशासाठी शौर्य गाजवलेल्या सैनिकांना राष्ट्रपतींच्या हस्ते अशोकचक्र आणि कीर्तिचक्र हे मुख्य पुरस्कार देण्यात येतात. राष्ट्रीय शौर्य पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आलेली देशातील शूर बालके सजवलेल्या हत्तीवरून किंवा वाहनावरून या संचलनात सहभागी होतात. प्रमुख पाहुणे म्हणून परराष्ट्रीय राष्ट्राध्यक्षांना निमंत्रण दिले जाते. भारतीय फौजा- नौदल, पायदल, वायूसेना यांचे वेगवेगळे सेनाविभाग, घोडदळ, पायदळ, तोफखाना आणि इतर अदययावत शस्त्रे-क्षेपणास्त्रे जसे- पृथ्वी, अग्नी, रणगाडे समवेत संचलन करतात. भारताचे राष्ट्रपती या फौजांची मानवंदना स्वीकारतात. भारताच्या विविधतेतून एकता या वैशिष्ट्याला ही मानवंदना असते. या संचलनाच्या सादरीकरणाची पूर्वतयारी विशेष काळजीपूर्वक व शिस्तीने केली जाते, इतके या संचलनाचे महत्त्व आहे. नवी दिल्ली येथे होणा?या संचलनाप्रमाणेच भारतातील सर्व राज्यांतही एकेक संचलन होते. प्रत्येक राज्यात त्या त्या राज्याचे राज्यपाल फौजांची मानवंदना स्वीकारतात. शेवटी बीटिंग रिट्रीट ?या कार्यक्रमाने प्रजासत्ताक दिन सोहळयाची सांगता केली जाते. प्रजासत्ताक दिनाच्या शुभेच्छा देण्यासाठी देशभक्तीपर गीतांच्या ओळी, तिरंगा ध्वज आदी संकल्पनांचा कल्पकतेने वापर करून परस्परांना शुभेच्छा दिल्या जातात. देशाभिमान मनात टिकून राहण्यासाठी भारतीय नागरिक अशा शुभेच्छा एकमेकांना देऊन परस्परांमधील ऐक्य टिकवून ठेवण्याचे आवाहनही केले जाते.

!! भारतीय प्रजासत्ताक दिनाच्या सर्व देशप्रेमी बंधुभगिनींना हार्दिक शुभेच्छा !!

# स्वातंत्र्य अबाधित ठेवण्यासाठीच प्रजासत्ताक?

स्वातंत्र्य घेता का हो स्वातंत्र्य. असं जर कोणी आपल्याला दिसलं तर आपण म्हणू की संबंधीत व्यक्तीला वेड तर लागलं नाही ना. तसं पाहिल्यास आज हेच म्हणण्याची वेळ आली आहे.

स्वातंत्र्य म्हणजे मुक्त जगणं. मनात येईल तसं जगणं. एवढा सोपा अर्थ आहे. आज हेच स्वातंत्र्य हिरावत चाललेले दिसत आहे. कारण आज माणसाच्या मनात चांगले विचार उरलेलेच नाही. सर्व कुविचार भरलेले आहेत. तरीही कालानुकाल काही थोर महात्म्ये जन्म घेतात व माणसाच्या मनातील कुविचारांचं शुद्धीकरण करतात. जसा रक्तात आलेला भेसळपणा दूर केला जातो. अर्थात कोलेस्टेरॉल वाढले असेल वा रक्त जाडसर झाले असेल तर ते काही फळं खावून वा जिनस कावून दूर केले जाते. इथं रक्त फळाच्या माध्यमातून शुद्ध होतं तर तिथं मन किर्तन, प्रवचन व सुविचाराने शुद्ध होतं. मनालाच शुद्ध करण्यासाठी स्वातंत्र्य असतं व स्वातंत्र्य अबाधित ठेवण्यासाठीच प्रजासत्ताक असतं. असे म्हटल्यास आतिशयोक्ती होणार नाही. याबाबत संत रोहिदास म्हणतात, 'मन चंगा तो कटौती मे गंगा' त्यानुसारच समर्थ रामदासांनी मनाचे महत्व लक्षात घेऊन म्हटले की मन करा रे प्रसनन सर्व सिद्धीचे कारण. एवढे मनाचे महत्व आहे. मन जर चांगले असेल तर आपल्याला कोणताच आजार छळत नाही. सर्व प्रकारच्या व्याधींपासून आपण अलिप्त राहू शकतो.

आज भारतीय प्रजासत्ताक. भारतीय प्रजासत्ताकाचा छ्यात्तरवा दिवस. भारतात प्रजासत्ताक स्वरुपाचं राज्य सव्वीस जानेवारी एकोणविसशे पननस पासून अस्तित्वात आलं. त्यापुर्वी भारतात प्रजासत्ताक नव्हतं.

प्रजासत्ताक म्हणजे लोकांचे लोकांनी लोकांकडून लोकांसाठी चालविलेले राज्य. असे राज्य हे सगळे देशच चालवत होते. हे सगळं बरोबर होतं. मग भारतात अशी कोणती गरज पडली की भारताला लिखीत राज्यघटना तयार करावी लागली व ती राज्यघटना लिहून ती सव्वीस जानेवारी एकोणविसशे पननसला भारतीय जनतेला बहाल करावी लागली? हा एक विचार करण्यालायकच प्रशन. तो कोणाच्याही मनात अगदी सहजच उद्भवेल.

भारत प्रजासत्ताक होण्यापुर्वी तो आधीपासूनच अंधश्रद्धेच्या बुरख्यात जगत होता. शिवाय या भारतातील बरीचशी मंडळी ही मेंढरागत वागत होती. ती हुशार नव्हती व ती एका अतिशय हुशार माणसांच्या बोलण्यावर वा दिशा दाखविण्यावर विश्वास ठेवणारी होती. जी माणसं ढोंगी होती. बरीचशी मंडळी याच ढोंगी माणसांच्या प्रभावात लिप्त होती. ती देवादिकात व अंधश्रद्धेत रमत होती. त्यातच अंगात येणे याही गोष्टी वारंवार घडत. मांत्रीकांचे प्रस्थ माजले होते. हे मांत्रीक एखादा आजार आल्यास त्यावर अमूक भूत लागला वा एखादा व्यक्ती मरण पावल्यास अमूकानं मुठ मारली अर्थात करणी केली. अशा आशयात लोकं गुरफटले जात होते. हा मांत्रीक गुप्त धन मिळवून देतो असे सांगून परीसरातील जीवंत मुलांचा नरबळी देत असे व ते जाहीरही होवू देत नसे. मांत्रीक हा दगडाच्या देवांना पुढे करुन सामान्य माणसांना लुटत असे. एवढे लुटत असत की सामान्य माणसांचं जगणं अति अवघड होवून जाई. शिवाय केशवेपण, बालविवाह, विधवांच्या विवाहास बंदी या सर्व गोष्टी कायदे बनले तरी समाजात सुरुच होत्या. त्यातच लोकं समाजाला दोष देत होते. जे सामान्य जीवन जगायचे. अंधश्रद्धेवर विश्वास करणा?या या समाजात त्यावेळच्या काळात संबंधक्रांतिकारांनी रणशिंग फुंकले. त्यांच्यात प्रयतनने भारत स्वतंत्र झाला. हे जरी खरं असलं तरी समाजाला नव्हे तर देशाला स्वातंत्र्य मिळाले होते. परंतु समाज सुधारला नव्हता. अशा समाजाला सुधारण्यासाठी वा त्यांना योग्य दिशा दाखविण्यासाठी भारतात काही नियमांची गरज होती. ज्या नियमानुसार देश चालेल. देशाला चालता येईल. तेच नियम म्हणजे घटना व ती राज्यासाठी लागू झाली होती. म्हणून ती राज्यघटना. भारतीय राज्यघटना सव्वीस जानेवारी एकोणविसशे पननसला लागू झाली. ाज्यघटनेची गरज जेव्हा भासली. तेव्हा एक बैठक भरली. ती राज्यघटनेची आढावा बैठक होती. राज्यघटना ही लिखीत स्वरुपाची असावी की अलिखीत स्वरुपाची? त्यातच तीन देशाच्या राज्यघटना अभ्यासल्या गेल्या. इंग्लंड, अमेरिका, स्वित्झर्लंड. इंग्लंडमध्ये अलिखीत राज्यघटना होती. अमेरिकेत लिखीत पण परिदृढ राज्यघटना होती. स्वित्झर्लंडमध्ये परीवर्तनशील स्वरुपाची राज्यघटना होती. शिवाय राज्यघटना कोणती स्विकारावी यावर चर्चा झाली. अशा प्रकारचे वादविवाद त्या काळात निर्माण झाल्यानंतर मग ठरलं की आपण अलिखीत राज्यघटना ठेवावी. कारण ज्या देशानं आपल्यावर एवढे वर्ष राज्य केलं. त्या देशाची राज्यघटना ही अलिखीत स्वरुपाची होती. परंतु काही मंडळी म्हणत होती की राज्यघटना ही लिखीत स्वरुपाची असावी. इंग्लडचं जावू दया. त्यानंतर कोण लिहिणार यावर विचारविमर्श झाला व पाच लोकांची समिती बनली. ज्या मसुदा समितीचे अध्यक्ष होते, डॉ बाबासाहेब आंबेडकर. त्यांनी आपल्या अथक परीश्रमातून राज्यघटना लिहिली. ज्या राज्यघटनेतून त्यांनी अंधश्रद्धा कायमच्या वगळल्या. विशेष म्हणजे त्यांनी राज्यघटनेत मांत्रीकतेचा समावेश केला नाही. तसंच राज्यघटनेत त्यांनी कोणत्याही धर्माला विशेष महत्व दिले नाही. कोणत्याही व्यक्तीला विशेष महत्व दिले नाही. सामान्य लोकांचा त्यात विचार केल्या गेला. त्यातच त्या राज्यघटनेतून स्री पुरुष भेदभावच नाही तर स्री पुरुष, स्पृश्य अस्पृश्य, गरीब श्रीमंत हाही भेदभाव मिटवला.

Printed, Published And Owned By NAJAKAT SHOUKAT SAYYED. Printed At Vishwa Prakashan Printers ,Aurangabad -jalna Highway Road Badnapur Dist Jalna - 431202 (Maharashtra)).Published from Near Police Station Badnapur Tq.Badnapur Dist Jalna -431202 (Maharastra) Editor- PARVEEN NAJAKAT SAYYED* (*Responsible As Per PR&B Act 1867 And Other Indian Law Related To Newspaper) RNI.REGD.NO.MAHMAR/2013/51856 (124411).(Tital code MAHMAR43151) Contact Us: 9923307786,9421947786 Email:- gaavmat@gmail.com/najakat7@gmail.com

# पालकमंत्री पंकजाताई मुंडे यांना पीसीएमच्यावतीने वृत्तपत्र व पत्रकारांच्या मागण्यांचे निवेदन

जालना । प्रतिनिधी - गेली पाच-सहा वर्षांपासून पत्रकार व वृत्तपत्रांचे अनेक प्रश्न प्रलंबित आहेत. यात प्रामुख्याने दर दोन वर्षांनी वृत्तपत्रांना महागाई निर्देशांकाची सांगड घालून दरवाढ करणे अपेक्षित असतांना गेल्या सहा वर्षांमध्ये एकदाही दरवाढ करण्यात आली नाही, मागील अडीच वर्षांपासून राज्यभरातील वृत्तपत्रांची पडताळणी रखडलेली असून ही पडताळणी तात्काळ करण्यात यावी. सहाय्यक संचालक आणि उपसंचालक पदांसाठीची एमपीएससीमार्फत भरती प्रक्रिया राबविण्यात यावी. यासह विविध मागण्यांचे निवेदन पालकमंत्री पंकजाताई मुंडे यांना रविवार (दि 26) रोजी जिल्हाधिकारी कार्यालयात देण्यात आले. यावेळी प्रेस कॉन्सील ऑफ महाराष्ट्र जालना जिल्ह्याच्यावतीने स्मृतीचिन्ह देऊन त्यांचा पालकमंत्रीपदी वर्णी लागल्याबद्दल स्वागत करण्यात आले.

दरम्यान पालकमंत्री पंकजाताई मुंडे यांनी लागलीच स्वीय सहाय्यकांना निवेदन देऊन पाठपुरावा करण्याच्या सुचना दिल्याने वृत्तपत्र व पत्रकारांचे प्रश?न मार्गी लागण्याची शक्यता निर्माण झाली आहे. यावेळी प्रेस कॉन्सील ऑफ महाराष्ट्रचे जालना जिल्हाध्यक्ष दीपक शेळके, सुहास वैद्य, नरेंद्र जोगड यांची उपस्थिती होती. मागण्यांचा सकारात्मक विचार करून येत्या 20 फेब्रुवारी 2025 पर्यत मागण्या मान्य करण्यात याव्यात व न्याय द्यावा. अन्थया लोकशाही मार्गाने आंदोलन करण्यात येणार असल्याचा ईशाराही निवेदनाच्या शेवटी देण्यात आला आहे.

मागण्या पुढील प्रमाणे-

शासनमान्य यादीत सामाविष्ट असलेल्या लघु संवर्गातील साप्ताहिकांवर शासनाकडून प्रसिद्धीस देण्यात येणा?ऱ्या दर्शनी व वर्गिकृत जाहिरात वितरण प्रणालीत प्रत्येकवेळी भेदभाव केल्या जात आहे. प्रसिद्धीस देण्यात येणा?ऱ्या जाहिराती ह्या मोठे, मध्यम संवर्गासह लघु संवर्गातील दैनिकांना दिल्या जातात. मात्र, लघु संवर्गातील साप्ताहिकांना टाळल्या जात आहे., शासकीय संदेश प्रसार नियमावली -2018 मधील 4.6.6 या मुद्द्यात बदल करून सर्व संवर्गातील दैनिक-साप्ताहिक वृत्तपत्रांना समान न्यायाने सरसकट जाहिराती देण्यात याव्यात. तसेच मागील वर्षभरात शासनमान्य यादीवरील लघु संवर्गातील साप्ताहिकांचा अनुषेश भरुन द्यावा.

शासकीय संदेश प्रसार नियमावली -2018 मधील 4.5.9 या मुद्यानुसार शासनमान्य यादीत सामाविष्ट असलेल्या लघु संवर्गातील साप्ताहिकांना रंगीत जाहिराती, पहिले पान, विशेष पान, नाविन्यपूर्ण जाहिराती देण्यात याव्यात.

शासकीय संदेश प्रसार नियमावली -2018 मधील 4.5.10 यानुसार दर दोन वर्षांनी दरवाढ करण्याचे आदेश आहेत. 4.5.2 मध्ये नमुद कोष्टकातील दराची महागाई निर्देशांकाशी सांगड घालून नवे वाढीव दर देण्यात यावे. ( कारण- गेल्या सहा वर्षांपासून एकदाही दरवाढ करण्यात आली नाही.)

शासकीय संदेश प्रसार नियमावली -2018 मधील 4.6.1 नुसार शासनाच्या



अधिनस्त मंडळ-महामंडळ, स्थानिक स्वराज्य संस्था, स्वायत्य संस्था आदींना लघु संवर्गातील साप्ताहिकांना जाहिरात देण्याचे बंधनकारक करावे.

शासकीय संदेश प्रसार नियमावली -2018 मधील 4.6.2 मध्ये बदल करण्यात यावा. यात वृत्तपत्रात निविदेसंदर्भात संक्षिप्त स्वरूपात जाहिरात प्रसिद्धीस देण्याची नोंद आहे. ती हटविण्यात येऊन संकेतस्थळावरील विस्तृत स्वरुपात प्रसिद्ध होणारी निविदा ही संपूर्णपणे वृत्तपत्रांना प्रसिद्धीस देण्यात यावी. आणि यातही लघु संवर्गातील साप्ताहिकांनाही अशी संपूर्ण निविदा प्रसिद्धीची जाहिरात देण्यात यावी.

शासकीय संदेश प्रसार नियमावली -2018 मधील 4.6.5 मध्ये बदल करून भुसंपादनाच्या जाहिराती ह्या लघु संवर्गातील साप्ताहिकांना प्रसिद्धीस देण्यात याव्यात. तसेच विभागीय माहिती उपसंचालकांकडून देण्यात येणा?ऱ्या जाहिरातीत लघु संवर्गातील साप्ताहिकास किमान एक जाहिरात देण्यात यावी

शासकीय संदेश प्रसार नियमावली -2018 मधील 4.6.7 मध्ये मान्यताप्राप्त यादीतील सर्व वृत्तपत्रांना एका आर्थिक वर्षात 9 व एक ऐच्छिक जाहिरात देण्यात येत आहे. यात सुधारणा करण्यात यावी. व एका आर्थिक वर्षात किमान 20 जाहिराती देण्यात याव्यात.

यात प्रामुख्याने महात्मा गांधी जयंती, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंती, भगवान महावीर जयंती, नाताळ (25 डिसेंबर) रमजान ईद, रामनवमी, विजयादशमी, साहित्यरतन्-अण्णाभाऊ साठे जयंती, स्वातंत्र्यवीर विनायक सावरकर जयंती, पोलादी पुरुष सरदार वल्लभभाई पटेल जयंती, महिलांच्या सन्मानार्थ महिला दिन अथवा मकर संक्रांत, महाराणा प्रताप जयंती, पंढरपूर यात्रानिमित्त व वृत्तपत्रांच्या वर्धापन दिन यातील जाहिरातीचा समावेश त्यात करण्यात यावा.

शासकीय संदेश प्रसार नियमावली -2018 मधील 4.6.8 नियमाची अंमलबजावणी करण्यात यावी व शासनमान्य यादीत सामाविष्ट नसलेल्या वृत्तपत्रांना या नियमानुसार जाहिरात देण्यात यावी.

शासकीय संदेश प्रसार नियमावली -2018 मधील 4.12 नुसार वेब आणि समाजमाध्यमांना जाहिराती देण्यासंबंधी नियमावली निश?चित करण्यात यावी. यात प्रामुख्याने शासनमान्य जाहिरात यादीत सामाविष्ट असलेल्या सर्वच संवर्गातील वृत्तपत्रांच्या वेब (ब्लॉगर/वर्डप्रेस), युट्युब, फेसबुक, ट्विटर, इन्स्टाग्राम आदी सर्व प्रकारच्या समाज माध्यमांना विनाअट जाहिराती देण्यात याव्यात.

एका आर्थिक वर्षात देण्यात येणा?ऱ्या जाहिराती ह्या 400 चौसेमी आकाराच्या देण्यात येतात. या आकारात सरसकट वाढ करण्यात येऊन किमान 1000 चौसेमी आकाराच्या जाहिराती देण्यात याव्यात.

साप्ताहिकांना देण्यात येणा?ऱ्या अधिस्विकृती पत्रिकेत वाढ करण्यात येऊन एका साप्ताहिकांच्या किमान 5 व्यक्तींना अधिस्विकृती पत्रिका देण्यात यावी

ज्येष्ठ पत्रकारांना देण्यात येणा?ऱ्या अधिस्विकृती पत्रिका व पेन्शन संदर्भातील जाचक अटी रद्द करण्यात याव्यात.

शासनमान्य जाहिरात यादीत सामाविष्ट वृत्तपत्रांना देण्यात येणा?ऱ्या जाहिरातीचे बील हे जाहिरात प्रसिद्धी नंतर किमान 30 दिवसांमध्ये अदा करण्यासंबंधी संबंधीत विभागांना आदेशित करावे. तसेच वृत्तपत्रांची मागील थकीत बीले ही तात्काळ अदा करण्यात यावी.

# जिल्ह्याच्या सर्वांगिण विकासासाठी राज्य शासन कटीबध्द - पालकमंत्री पंकजा मुंडे

जालना, दि. 26 जिमाका :- स्वातंत्र्य हा आपला अधिकार तर प्रजासत्ताक हा आपला अलंकार आहे. जालना जिल्ह्यात भाईचारा व संविधानाला सन्मान देणारा वर्ग उदयास यावा अशी आशा व्यक?त करते. तसेच जालना जिल्ह्यातील शेतकरी व सर्वसामान्य नागरिकांच्या प्रगतीकरीता तसेच जिल्ह्याच्या सर्वांगिण विकासासाठी राज्य शासन कटीबध्द राहिल, असे प्रतिपादन राज्याच्या पर्यावरण व वातावरणीय बदल, पशुसवंर्धन मंत्री तथा जालना जिल्ह्याच्या पालकमंत्री श्रीमती पंकजा प्रज्ञा गोपीनाथ मुंडे यांनी केले.



भारतीय प्रजासत्ताक दिनाच्या वर्धापन दिनानिमित्त जालना येथील पोलीस मुख्यालय मैदानावर श्रीमती मुंडे यांच्या हस्ते आज मुख्य शासकीय ध्वजारोहण करण्यात आले, त्यावेळी त्या बोलत होत्या. याप्रसंगी खासदार डॉ. कल्याण काळे, आमदार बबनराव लोणीकर, आमदार अर्जुन खोतकर, आमदार नारायण कुचे, आमदार संतोष दानवे, आमदार हिकमत उढाण, आमदार राजेश राठोड, जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी वर्षा मीना, जिल्हा पोलीस अधीक्षक अजयकुमार बन्सल आदींसह स्वातंत्र्य सैनिक, लोकप्रतिनिधी, अधिकारी, कर्मचारी, पत्रकार व नागरिक, विद्यार्थी उपस्थित होते.

पालकमंत्री श्रीमती मुंडे म्हणाल्या की, लोकशाही प्रणालीचा दीपस्तंभ ठरलेली भारतीय राज्यघटना राष्ट्राला अर्पण करण्यात आल्याने जगामध्ये भारत देश एक प्रजासत्ताक गणराज्य म्हणून उदयास आले. लोकशाही तंत्राने घटनेनुसार देशाचा कारभार सुरु झाला. नागरिकांना राज्यकारभारात सहभागी होण्याचा अधिकार मिळाल्याने या दिवसाला विशेष महत्व आहे. भारतीय घटना समितीच्या मसुदा समितीचे अध्यक्ष भारतरतन्-डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे संविधान निर्मितीमध्ये अमुल्य योगदान राहिले. त्यामुळेच जगात भारतीय लोकशाही श्रेष्ठ ठरली आहे.

आपला जालना जिल्हा विकासाभिमुख जिल्हा म्हणून ओळखला जातो. विविध योजनांच्या यशस्वी अंमलबजावणीमुळे विविध क्षेत्रात सतत अग्रेसर राहिला आहे, त्याचा मला जिल्ह्याची पालकमंत्री म्हणून अतिशय आनंद आणि अभिमान आहे. राज्य शासनाने सर्वसामान्य जनतेसाठी काही महत्वकांक्षी योजना सुरु केल्या आहेत. यामध्ये मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजना, मुख्यमंत्री वयोश्री योजना, मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना, मुख्यमंत्री तीर्थ दर्शन योजना, मुख्यमंत्री बळीराजा मोफत वीज पुरवठा योजना, मुख्यमंत्री अनन्पूर्णा योजना आणि मुलींना मोफत उच्च शिक्षण योजना या योजनांचा समावेश आहे.

'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना' अंतर्गत जालना जिल्ह्यात 5 लाख 25 हजार पात्र महिलांना या योजनेअंतर्गत प्रति महा 1 हजार 500 लाभ देण्यात येत आहेत. तसेच राज्यातील 65 वर्ष व त्यावरील ज्येष्ठ नागरिकांना त्यांच्या दैनंदिन जीवनात सामान्य स्थितीत जगण्यासाठी 'मुख्यमंत्री वयोश्री योजना' सुरु करण्यात आली आहे. त्याअंतर्गत जिल्ह्यात 2 हजाराहून अधिक अर्ज प्राप्त असून, त्यातील 468 जेष्ठ नागरिकांचे अर्ज पात्र ठरले आहेत.

राज्यातील युवकांना शिक्षणानंतर प्रत्यक्ष कामाचे प्रशिक्षण देवून त्यांची नौकरी मिळण्याची क्षमता वाढविण्यासाठी 'मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना' सुरु करण्यात आली असुन आतापर्यंत 1 हजार 665 बेरोजगार युवकांची शिकाऊ प्रशिक्षणार्थी म्हणुन निवड करण्यात आलेली आहे. तसेच राज्यातील 60 वर्षांवरील जेष्ठ नागरिकांना भारतातील तीथऱ्यात्रांना भेट देण्याची इच्छा पूर्ण करण्यासाठी शासनाने 'मुख्यमंत्री तीर्थ दर्शन योजना' सुरु केली आहे. या योजनेअंतर्गत अर्ज स्विकारुन योग्य कार्यवाही सुरु आहे. 'मुख्यमंत्री बळीराजा मोफत वीज पुरवठा योजना' अंतर्गत शेतक?ऱ्यांवर येणा?ऱ्या वीज बिलाचा भार कमी करणे हा आहे.

# दिव्यांग व्यक्तींना ई व्हेईकलसाठी अर्ज करण्याचे आवाहन

जालना-दिव्यांग व्यक्तींना स्वावलंबी होण्याच्या दृष्टीने सन 2024-25 मध्ये हरित ऊर्जेवर चालणा?ऱ्या पर्यावरणसन्हेी फिरत्या वाहनावरील दुकान (मोबाईल ऑन ई-व्हेईकल) मोफत उपलब्ध करुन देण्याबाबतची योजना लागू करण्यात आली आहे.

योजनेचे उद्देश दिव्यांग व्यक्तींना पुरेशा सोयी- सुविधा उपलब्ध करुन रोजगार निर्मितीस चालना देणे. दिव्यांग व्यक्तींचे आर्थिक, सामाजिक पुनर्वसन करणे. सर्वसामान्य व्यक्तींप्रमाणे दिव्यांग व्यक्तींना त्यांच्या परिवार/कुटुंबासमवेत जीवन जगण्यास सक्षम करणे हे आहे.

योजनेचा लाभ राज्यातील गरजु दिव्यांग व्यक्तींना मिळण्यासाठी अर्जदारांनी नाव नोंदणीसाठी पोर्टल दि. 22 जानेवारी 2025 रोजी प्रक्षेपित करण्यात आले आहे. दिव्यांग व्यक्तींकडून ऑनलाईन अर्ज करण्यासाठी https://register.mshfdc.co.in ही लिंक उपलब्ध आहे. या लिंकद्वारे दिव्यांग व्यक्तींना ऑनलाईन अर्ज करण्यासाठी. दि. 6 फेब्रुवारी 2025 सायंकाळी 6.00 वाजेपर्यंत मुदत देण्यात आली आहे.या योजनेचा लाभ अधिकाधिक दिव्यांग व्यक्तींना घेण्याचे आवाहन महाराष्ट्र राज्य दिव्यांग वित्त व विकास महामंडळ मर्या. चे जिल्हा व्यवस्थापक यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे केले आहे.

# राज्य शासनाने गोरगरीब जनतेच्या हितासाठी एसटी दरवाढ मागे घ्यावी-माजी आमदार सांबरे

## जिल्हाधिकारी जालना यांना निवेदन सादर;जालना व बदनापूर येथे शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने चक्काजाम आंदोलन

जालना / एसटीची सेवा ही ग्रामीण व शहरी जनतेसाठी जीवन रेखा असून राज्यातील सर्वसामान्य प्रवाशांची जीवन वाहिनी म्हटल्या जाणा?ऱ्या एसटीच्या तिकीट दरात वाढ करण्याचा निणऱ्य राज्य सरकारने घेतला आहे महाराष्ट्र राज्य परिवहन विभाग व राज्य सरकारने दिनांक 25 जानेवारी 2025 पासून एसटीच्या तिकीट दरात वाढ करण्याचा निणऱ्य घेतला असून तो सर्वसामान्य प्रवाशांच्या दृष्टीने हितकारक नाही राज्य परिवहन प्राधिकरणाच्या बैठकीत एसटीच्या भाडेवाडीला मंजुरी देण्यात आली असून सर्वसामान्य प्रवाशांच्या खिशात मोठा भार पडणार आहे तसेच या भाडेवाडीमुळे गरीब व मध्यमवर्गीयावर आर्थिक बोजा पडणार आहे एसटी महामंडळाने शनिवार मध्यरात्रीपासून 15 टक्के भाडेवाढ जाहीर केली आहे. त्यामुळे खेडोपाड्यातील सर्वसामान्य जनतेचा प्रवास महागला आहे. एसटीची भाडेवाढ करताना ती पाचच्या पटीत असायला हवी होती. परंतूही भाडेवाढ विषम प्रमाणात झाल्याने आता ग्रामीण भागातील जनतेला तिकीट काढताना सुट्टे पैसे देताना अडचण होत आहे.

नवीन भाडेवाढ करताना ती सम प्रमाणात न झाल्याने सुट्टे पैसे जर प्रवाशांकडे नसतील तर कंडक्टर आणि प्रवाशांत वाद उद्धभवनार असून ही भाडे वाढ एसटी प्रवासी आणि कंडक्टर यांच्यात वाद करणारी ठरणार आहे त्यामुळे सरकारने गोरगरीब जनतेसाठी सदरची भाडे वाढ रद्द करण्यात येऊन घेतलेला निणऱ्य मागे घेण्यात यावा असे माजी आमदार संतोष सांबरे यांनी मा. जिल्हाधिकारी जालना यांना दिलेल्या निवेदनात सांगितले.

WEEKLY GAAVMAT



# दगडवाडी येथे मोफत नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबीरात ;188 रुग्णांची तपासणी;53 रुग्णांची होणार मोतीबिंदू शस्त्रक्रिया

बदनापूर-अनेक जण समाजसेवा म्हणून मोफत आरोग्य ,नेत्र तपासणी शिबिरे घेत असतात परंतु आरोग्य ,नेत्र तपासणी नंतर रुग्णांना औषधी,शास्त्रक्रया व येण्या जाण्याचा खर्च स्वतःच करावा लागतो त्यामुळे त्या मोफत शिबिरांचा लाभ ख?या अर्थाने रुगांना मिळत नाही मात्र निर्मल क्रीडा व समाज प्रबोधन ट्रस्टच्या बदनापूर न्यू लाईफ केअर हॉस्पिटल व चिकलठाणा लायन्स नेत्र रुग्णालय यांच्या संयुक्त विद्यमाने संस्थेचे अध्यक्ष डॉ.देवेश पाथ्रीकर यांनी बदनापूर मतदार संघात मोफत नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिरांचे आयोजन करण्यास सुरवात केलेली असून रुग्णांना येण्या जाण्यापासून ते औषधी व शस्त्रक्रिया तसेच जेवणाची व्यवस्था त्यांनी स्वतः करून एक आगळा वेगळा उपक्रम हाती घेतलेला असून 24 जानेवारी रोजी दगडवाडी येथे मोफत नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबीर घेण्यात आले या शिबिरात 188 रुगनंची तपासणी करण्यात आली.त्यामध्ये 53 रुग्णांची मोतीबिंदू शस्त्रक्रिया केली जाणार आहे.

अनेक सामाजिक संस्था किंवा दवाखाना चालक मोफत आरोग्य,नेत्र तपासणी शिबिरे आयोजित करून केवळ मोफत तपासणी करून रुगनंचे रोग निदान करतात तदन्तर रुगांना जालना किंवा औरंगाबाद येथे दवाखान्यात जाऊन उपचार घ्यावे लागते तेव्हा येण्या जाण्याच्या खर्चासाहित औषधी,शस्त्रक्रिया ,दवक्षणायत राहण्याचा खर्च व हॉटेलचे जेवण हा सर्व खर्च स्वतः रुगांना किंवा त्यांच्या नातेवाईकांना कारवाया लागतो त्यामुळे मोफत आरोग्य किंवा नेत्र तपासणी शिबिरांचा ख?या अर्थाने काहीच फायदा रुग्णांना होत नाही अश्या परिस्थितीत रुगनंचे आतोनात हाल होतात, त्यामुळे निर्मल क्रीडा व समाज प्रबोधन ट्रस्ट संचलित बदनापूर न्यू लाईफ केअर हॉस्पिटल व चिकलठाणा लायन्स नेत्र रूगनलाय यांच्या संयुक्त विद्यमाने संस्थेचे




अध्यक्ष डॉ. देवेश पाथ्रीकर यांनी रुगनंची खरी अडचण लक्षात घेऊन बदनापूर तालुक्यात मागील दोन वर्षापासून मोफत नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिरांचे आयोजन प्रत्येक गावात सुरु केले आहे ,गावात वैधकीय अधिकारी व कर्मचारी जाऊन नेत्र तपासणी करतात व रुग्णांना मोफत औषधी ,चसमें वाटप करतात आणि ज्या रुगनंची मोतीबिंदू शस्त्रक्रिया करणे आवश्यक आहे अश्या रुगनंना शस्त्रक्रियेसाठी तारीख दिली जाते आणि त्या तारखेला संबंधित गावात संस्थेची चारचाकी वाहने पाठवून रुगनंना चिकलठाणा येथील नेत्र रुगालयात नेऊन दाखल करून त्या ठिकाणी राहण्याची,जेवणाची व शस्त्रक्रियेसाठी इतर खर्च संस्थेच्या वतीने करून यशही शस्त्रक्रियेनंतर रुग्णांना पुन्हा वाहनाने घरी नेऊन सोडले जाते अश्या डॉ.देवेश पाथ्रीकर यांच्या उपक्रमाने ग्रामीण भागातील रुग्णांना चांगली सुविधा मिळत असल्याने रुगणांमध्ये समाधान व्यक्त केले जात आहे.

निर्मल क्रीडा व समाज प्रबोधन ट्रस्टच्या वतीने बदनापूर तालुक्यातील मागील दोन वर्षात 110 मोफत नेत्र तपासणी शिबिरे घेण्यात आली व या शिबिरांच्या माध्यमातून 15 हजार लोकांची मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया करण्यात आलेली आहे , 24 जानेवारी रोजी बदनापूर मतदार संघातील दगडवाडी येथे मोफत नेत्र तपासणी शिबीर घेण्यात आले या शिबिरात जवळपास 188 रुग्णांची नेत्र तपासणी करण्यात आली यामध्ये 53 रुग्णांची शस्त्रक्रिया करणे आवश्यक असल्याने त्यांना औषधी देऊन शस्त्रक्रियेसाठी तारीख देण्यात आली,सदर शिबीर यशस्वी करण्यासाठी सरपंच ,उपसरपंच ,सदस्य आदींनी परिश्रम घेतले



जिल्हाधिकारी कार्यालयाच्या प्रांगणात

जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांच्या हस्ते ध्वजारोहण संपनन

जालना, दि. 26 (जिमाका) :- प्रजासत्ताक दिनाच्या 76 व्या वर्धापन दिनानिमित्त जालना येथील जिल्हाधिकारी कार्यालयाच्या प्रांगणात जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी अपर जिल्हाधिकारी रिता मैत्रेवार, निवासी उपजिल्हाधिकारी गणेश महाडिक, उपजिल्हा निवडणूक अधिकारी शशिकांत हदगल, उपजिल्हाधिकारी नम्रता चाटे, सरिता सुत्रावे, मनिषा दांडगे, उपविभागीय अधिकारी श्रीमंत हारकर यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी- कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पीसीएम जालनाच्यावतीने वृत्तपत्र व पत्रकारांच्या मागण्यांचे उपमुख्यमंत्री शिंदे व आ.लोणीकर यांना निवेदन

जालना । प्रतिनिधी - गेली पाच-सहा वर्षांपासून पत्रकार व वृत्तपत्रांचे अनेक प्रश?न प्रलंबित आहेत. हे प्रश?न प्राधान्याने सोडविण्यात यावे या आशयाचे निवेदन प्रेस कॉन्सील ऑफ महाराष्ट्र (पीसीएम) जालना जिल्ह्याच्यावतीने राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे तसेच आमदार बबनराव लोणीकर यांना शनिवार (दि 25) रोजी आ. लोणीकर यांच्या निवासस्थानी देण्यात आले आहे. प्रसंगी माजी मंत्री आ. अर्जुनराव खोतकर यांची उपस्थिती होती. यावेळी आ. लोणीकर यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी चर्चा करुन प्रश?न मार्गी लावणार असल्याचे आश?वासन दिले आहे. माजी मंत्री आ. अर्जुनराव खोतकर यांनीही उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना याबाबत सविस्तर माहिती देऊन पत्रकार आणि वृत्तपत्रांच्या हितासाठी योग्य ते निणऱ्य घेण्यासाठी आपण स्वतः पुढाकार घेऊ असे आश?वस्त केले. यावेळी प्रेस कॉन्सील ऑफ महाराष्ट्रचे जालना जिल्हाध्यक्ष दीपक शेळके, सरचिटणीस दर्पण सकलेचा, सुहास वैद्य, नरेंद्र जोगड यांची उपस्थिती होती.

यात प्रामुख्याने गेल्या अडीच वर्षांपासून शासकीय संदेश प्रसार नियमावली-2018 नुसार शासनमान्य यादीत समावेश करण्यासाठी राज्यभरातील वृत्तपत्रांची पडताळणी झालेली नाही. त्या अनुषंगाने बैठक झालेली नाही. राज्यभरातील अनेक वृत्तपत्रांचे अहवाल शासन दरबारी प्रलंबित आहेत. ग्रामीण भागातील पत्रकारांना मुख्यालयी त्यांच्या तालुका-जिल्ह्याच्या ठिकाणच्या वृत्तपत्र कार्यालयात येण्या-जाण्यासाठी बस पासची सुविधा उपलब्ध करून द्यावी अथवा या पत्रकारांना अधिस्विकृती पत्रिका मिळावी यासाठी पूर्णवेळ पत्रकारितेची असलेली अट शिथील करण्यात यावी. तसेच गेल्या सहा वर्षांमध्ये एकदाही दरवाढ झालेली नाही, शासकीय संदेश प्रसार नियमावली 2018 नुसार दर दोन वर्षांनी महागाई निर्देशांकाशी सांगड घालून दरवाढ करणे अपेक्षित होते मात्र, दरवाढ झालेली नाही. नियमानुसार दरवाढ करण्यात यावी, अधिस्विकृती धारक पत्रकारांना काही बसेसमध्ये सवलत मिळत नाही. यासाठी महामंडळाच्या सर्व प्रकाराच्या प्रत्येक बसमध्ये (एसी, नॉन एसी, साधी, निमआराम, रातराणी, इलेक्ट्रीक, एशियाड अशा सर्वच प्रकारच्या ) अधिस्विकृती पत्रिकाधारकांना सवलत मिळावी. माहिती व जनसंपर्क महासंचालनालय अंतर्गत सहाय्यक संचालक आणि उपसंचालक पदांसाठी (जाहीरात क्रं. 129/2022, 130/2022 व 131/2022) एमपीएससी मार्फत भरती प्रक्रिया राबविण्यात येत होती. ही प्रक्रिया मागील दोन वर्षांपासून प्रलंबित आहे. यात काही पत्रकारांनीही अर्ज केलेले आहेत. ही भरती प्रक्रिय राबविण्यात यावी, शासकीय संदेश प्रसार नियमावली -2018 मधील 4.6.2 मध्ये बदल करण्यात यावा. यात वृत्तपत्रात निविदेसंदर्भात संक्षिप्त स्वरूपात जाहिरात प्रसिद्धीस देण्याची नोंद आहे.


